*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XIV / Issue – I* *ISSN 2277-8063*

# **"डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांच्या उन्नती विषयक अधिकार व कार्य"**

**प्रा.ज्योत्स्ना गंगाराम गायकवाड** राज्यशास्त्र विभाग प्रमुख विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब-वालचंदनगर
ता.इंदापूर जि. पुणे 413114

---

**प्रास्ताविक-**

प्राचीन भारतीय कालखंडाचा विचार केला असता यामध्ये ऋग्वेदमध्ये समावेश हा दिसून येतो या कालखंडामध्ये महिलांना मातृ प्रधान कुटुंबामध्ये एका अस्तित्वाची भावना होती त्यांना स्थान दिले जात होते त्यानंतर वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांना पितृसत्ता कुटुंब पद्धतीमुळे कुठल्याही प्रकारचे महत्त्व हे देण्यात आलेले नव्हते त्यामुळे स्त्रियांपेक्षा पुरुषांचे महत्त्व त्या ठिकाणी वाढले होते मध्ययुगीन कालखंडामध्ये सुद्धा महिलांना अनेक वाईट चालीरीतींना तोंड द्यावे लागत होते या कालखंडामध्ये मनुस्मृती ग्रंथाचा मोठ्या प्रमाणात आधार घेतल्यामुळे स्त्रियांना चार भिंतीच्या आत राहण्याची मर्यादा ही त्या ठिकाणी करण्यात आली होती आणि त्यामुळे तिचा कोण तुम्ही घरी सामाजिक दर्जा हा दोन मान्यता आला होता तिच्यावर विविध धार्मिक बंधने लादण्यात आली होती या काळामध्ये भारतीय समाजामध्ये सती प्रथा बालविवाह पडदा पद्धती अंतर्विवाह खुलीन विवाह विधवा विवाह हुंडाबंदी प्रथा यामुळे स्त्रियांचा दर्जा हा अतिशय घसरलेला होता स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात इंग्रजांची सत्ता असल्यामुळे ब्रिटिशांनी सर्वच सर्वांना शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी कार्य केले त्यामध्ये लॉर्ड पेंटिंग यांच्या मदतीने राजाराम मोहनरा यांनी सती प्रथा बंदी ला बंदी घातली बालविवाह सारख्या प्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला त्याचबरोबर स्त्री शिक्षण विचारांना चालना देण्याचा प्रयत्न केला हुंडाबंद हुंडा प्रथा बालविवाह स्त्रियांकरिता समान अधिकार आंतरराष्ट्रीय सद्भावना अशा माध्यमातून कार्य करण्याचा प्रयत्न झाले

भारतामध्ये स्वातंत्र्यापर्यंत भारतीय स्त्रियांना कोणत्याही प्रकारचा हक्क आणि अधिकार बजावण्याचा अधिकार नव्हता सामाजिक दृष्ट्या कुटुंबातील झुलांनी मुल इथपर्यंतच तिचा अस्तित्व आहे टिकून होतं परंतु स्वातंत्र्य भारताची राज्यघटना जेव्हा अस्तित्वात आली तेव्हा स्त्री पुरुष समानतेचा कायदा कायद्याचा आधार हा मिळाला देशाची नवी राज्यघटना भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केली आणि स्त्रियांना स्वातंत्र्याच्या अधिकाराचे पुरस्कार त्यामध्ये केले त्यांनी घटनेमध्ये स्त्रियांनी पुरुषांच्या समाधीला मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिले त्याचबरोबर घटनेच्या पंधराव्या कलमांमध्ये लिंग भेद या आधारावर कोणत्याही नागरिकाविरुद्ध राज्यांमध्ये कसल्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही अशा पद्धतीची तरतूद ही टाकण्यात आली. त्याचबरोबर स्त्रियांना समाधीचा हक्क प्राप्त करून देण्याचा प्रयत्न हा केला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल यासारखा अतिशय प्रभावी असा हक्क स्त्रियांना मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले या या हक्का नुसार सर्व भारतीय महिलांना त्यांच्या त्यांचा समाजातील दर्जा उंचावण्यासाठी समानतेचा अधिकार मोठ्या प्रमाणात प्राप्त होणारा होता त्याचबरोबर प्रत्येक बाबतीमध्ये स्त्रीला तिचे स्थान प्राप्त होणार होते ह्या अधिकाराच्या माध्यमातून स्त्रियांना चालना देण्यासाठी मोठे पाऊल डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी उचलले होते.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे महिलांविषयी हक्क आणि अधिकार संदर्भात कार्य-

1. **हिंदू कोंड बील-**

हिंदू कोड बिलाची मागणी धरून स्त्रियांच्या कल्याणाचे महत्त्व पाऊल उचलण्याचे काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी इसवी सन 1947 ते 1951 या चार वर्षे एक महिना 26 दिवस या अथक परिश्रमाने हिंदू कळविला ची तयारी केली होती या बिलामुळे स्त्रियांबाबत जो भेदभाव होता त्या काळा बसेल व स्त्रियांना अधिक सक्षम होता येईल अशी धारणा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची होती स्त्रियांना त्यांचे न्याय हक्क मिळावेत म्हणून हिंदू कोड बिल मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला त्याला बराचसा विरोधी झाला परंतु 1955 ते 1956 या कालावधीमध्ये हिंदू हिंदू गोडबोलाचे चार निर्णय भाग करून त्यांनी कायद्यात संमत करण्यात यावे अशा पद्धतीचा विचार मांडला त्यामध्ये

1)हिंदू विवाह कायदा(1955)
2)हिंदू वारसा हक्क कायदा (1956)
3) हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा (1956)
4) हिंदू दत्तक व पोटगी कायदा(1956)

**1)हिंदू विवाह कायदा**

हा विवाह म्हणजे संस्कार आहे ही सणात आणि कल्पना कायद्याने जुगारून दिली आणि विवाह एक सामाजिक करार आहे ही कल्पनाच स्वीकारून त्यांनी हिंदू पुरुषाला प्रथम पत्नी जिवंत असताना दुसरे लग्न करण्याचा अधिकार नाही तो

*NAVJYOT / Vol. XIV / Issue – I* *ISSN 2277-8063*

गुन्हा आहे त्या तुरुंगवासाची शिक्षा ठरवण्याचा प्रयत्न केला त्याचबरोबर एखाद्या अज्ञात मुलीशी तिच्या इच्छेनुसार किंवा पालकाच्या संमतीशिवाय विवाह केला तर त्याला दंड होऊ शकतो त्याचबरोबर काही विशिष्ट नातेवाईकाशी विवाह करण्यास हा कायदा मजाव करतो त्याचबरोबर वधू-वरांची वयोमर्यादा ही त्या ठिकाणी महत्त्वाची ठरते या कायद्यानुसार विवाहासाठी खास कोणत्याही विधी हा प्रचलित रीतीप्रमाणे करण्यास मोकळी करण्यात आलेली होती त्याचबरोबर या विवाहात विभक्त होणे किंवा घटस्फोट अशात दोन तरतुदी ही करण्यात आली होत्या.

**2)हिंदू अज्ञान व पालकत्वाचा कायदा**

या कायद्याच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हक्क संरक्षण मिळवून देऊन महिला सक्षमीकरणाचा प्रयत्न केला मुलांच्या पालकत्वाचा आग्रह क्रम वडिलांना मिळते त्याच पद्धतीने तो आईकडे मिळाला पाहिजे यासाठी त्यांनी प्रयत्न केला हिंदू पुरुषाप्रमाणे हिंदू स्त्रीलाही मृत्युपत्र करून आपल्या नंतर पालक नेमण्याचा अधिकार दिला आणि स्वतःला लाभलेल्या एसटीची स्त्री आता पूर्णतः मालक होईल ही या कायद्यामध्ये तरतूद करण्यात आली

**3)हिंदू वारसा हक्क कायदा**

या कायद्यानुसार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना सक्षम बनवण्यासाठी वारसा हक्क मिळवून दिला त्यामध्ये कायद्यात श्रीधर व स्त्रीची मर्यादा इस्टेट हा प्रकार नष्ट केला आणि पुरुष भेद नसल्यामुळे स्त्री स्टेट स्त्रीवरील अधिकार मर्यादा नाहीत आणि वर्षाप्रमाणे तिलाही संपत्तीमध्ये भाग हा मिळाला पाहिजे हे कायद्यानुसार नुसार ठरवण्यात आली स्त्रीच्या मृत्युपत्रानुसार आपल्या पश्चात आपल्या इच्छेनुसार संपत्ती व्यवस्थापन लावू शकते विधवा पत्नी किंवा सोनियांनी वारसा मिळवल्यानंतर जर पुनर्विवाह केला तर वारसा हक्काने मिळालेली संपत्ती त्यावर प्रतिकूल परिणाम होऊ शकत नाही त्याचबरोबर 1956 च्या कायद्यानुसार स्त्रीचे वर्तन अनैतिक आहे या कारणावरून तिचा वारसा हक्क रद्द होऊ शकत नाही अशा पद्धतीच्या तरतुदी या हक्का नुसार करण्यात आल्या

**4) हिंदू दत्तक व पोटगी कायदा**

दत्त घेण्याचा व्यक्तिगत अधिकार स्त्रियांना प्रथमच या कायद्यानुसार देण्यात आला अविवाहित पुरुषाप्रमाणेच अविवाहित स्त्री देखील दत्त घेऊ शकते मुलाप्रमाणे मुलगी ही दत्त घेता येते स्वतःला मुलगा नसेल किंवा एखादी एकही मुलगी नसेल तर तिला दत्त घेता येते मुलगीच असेल तर मुलगा दत्त घेता येतो त्याचबरोबर वडील हयात असताना मुलांना दत्त घेण्याचा आईला अधिकार नाही कायद्याने तू प्रथम वडिलांना आहे आता त्याच्यासाठी प्रथम त्याला आपल्या पत्नीची मुलाच्या आईची परवानगी घ्यावी लागते विवाहित स्त्रीला स्वतःच्या नावापुढे पतीचे नाव घालायची कायदेशीर गरज नाही पत्नीचे अपत्व परिस्थिती असेल तर पतीलाही तिच्याकडून पोटगी मागण्याचा अधिकार आहे स्त्रीवर या कायद्याने तिच्या व मुलांच्या वृद्धकाळात जबाबदारी टाकण्यात आलेली आहे

या कायद्यांच्या माध्यमातून स्वातंत्र्य समता बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांच्या आधारावर मुलाप्रमाणेच मुलींनाही शिक्षण देणे त्यांना नोकरी करू देणे स्त्री-पुरुष असा भेद न करणे यासारख्या वेगवेगळ्या गोष्टींना विशेष महत्त्व प्राप्त करून देण्याचा प्रयत्न हिंदू कोडबिलांच्या माध्यमातून करण्यात आल होता.

भारतीय संविधानातील स्त्री हक्क विषयक तरतुदी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील जाती व्यवस्थेवर आधारित हिंदू धर्माचा व विषमतेचा करून सामाजिक समता निर्माण करण्याचा मानससमोर ठेवून भारतीय राज्यघटना निर्माण केली या राज्यघटनेत त्यांनी बुद्ध आणि फुलांच्या विचारांना चेहरा दिला सामाजिक न्याय व सामाजिक संस्थेचा पुरस्कार त्यांनी या संविधानाच्या माध्यमातून केलेला आहे स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले व या संविधानिक अधिकाराचा निश्चितच स्त्रियांच्या दर्जावर परिणाम झालेला आहे त्यामध्ये कलम 14 सार्वजनिक कायद्यापुढे समानता असतील कलम 15 धर्म, जात, लिंग ,जन्मस्थान यावरून कोणत्याही प्रकारचा भेदभाव करता येणार नाही कलम 16 शासकीय सेवेत सर्वांना समान संधी दिली जाईल भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार जे समतेचे तत्व आणि कारले होते त्या तत्त्वाशी सुसंगत अशी हिंदू कोड बिल बनवण्यात आली होती स्त्रियांना क्रीडा मुक्त करून न्याय मिळवून देण्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी याला कायद्याचा समावेश करण्यात आला होता.

1)**समान मोबदला मिळवण्याचा अधिकार**

या तरतुदीनुसार पगार, वेतन यामध्ये कोणत्याही आधारावर भेदभाव केला जाऊ शकत नाही. नौकरी करणाऱ्या महिला आ पुरुषाप्रमाणेच पगार मिळवण्याचा अधिकार आहे.

**सन्मान आणि शालिनीतेचा अधिकार**

महिलांना सन्मानाने आणि शालिनी जगण्याचा अधिकार मिळाला आहे कोणत्याही परिस्थितीत महिला आरोपी असेल तिची वैद्यकीय तपासणी केली जात असेल तर ते काम दुसऱ्या महिलेच्या उपस्थित व्हायला हवे

**2. कौटुंबिक हिंसाचाराच्या विरोधात हक्क**

भारतीय राज्यघटनेच्या कलम 498 नुसार पत्नी महिला किंवा घरात राहणाऱ्या महिलेला घरगुती किंवा हिंसाचाराच्या विरोधात आवाज उठवण्याचा अधिकार आहे पत्नी किंवा पुरुष पार्टनर नातेवाई त्यांच्या कुटुंबातील महिलांवर शाब्दिक आर्थिक भावनिक किंवा मुलगी हिंसा करू शकत नाही असे केल्यास आरोपीला तीन वर्षाची अजामिन पात्र कारावासाची शिक्षा होऊ शकते आणि दंड भरावा लागतो.

4) **स्त्री महिलेला अटक करू शकत नाही-**

महिला आरोपीला सूर्यास्तानंतर किंवा सूर्योदयापूर्वी अटक करता येत नाही प्रथम वर्ग न्यायदंड अधिकाऱ्यांच्या आदेशाचा अपवाद आहे जर एखाद्याच्या घरात चौकशी केली जात असेल तर हे काम महिला कॉन्स्टेबल किंवा कुटुंबातील सदस्यांच्या उपस्थित केले जावे असेही कायदा सांगितले आहे.

5) **अभद्र भाषा वापरू शकत नाही**

कोणत्याही स्त्रीचे तिचे स्वरूप किंवा शरीराचा भाग कोणत्याही प्रकारे असा निंदनीय किंवा सार्वजनिक नैतिकता आणि सामाजिक नैतिकता भ्रष्ट करणारी म्हणून तिचा आपमान केली जाऊ शकत नाही असे करणे दंडणीय गुन्हा आहे.

**निष्कर्ष-**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर की स्त्रियांच्या हक्काचे कैवारी मानले जातात. समाजातील तळागाळातील उपेक्षित घटक म्हणून स्त्रीकडे पाहिले जाते. त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याची महत्त्वपूर्ण कार्य व मिळवून देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली स्त्रियांना समाजामध्ये समानतेची वागणूक मिळावी त्यांना त्यांचा दर्जा व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव व्हावी यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच संविधानामध्ये वेगवेगळ्या तरतुदीच्या माध्यमातून कायदेशीर हक्क देण्याचा प्रयत्नही केला. व संरक्षणात्मक तरतुदी ही केल्या म्हणून आज स्त्रिया अनेक वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपली कामगिरी व भूमिका बजावताना दिसतात म्हणूनच आज स्त्रिया पुरुषाच्या बरोबर खांद्याला खांदा लावून काम करण्याची आपली धमक ठेवताना दिसतात.

**संदर्भ-**

1)डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ

2)डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल चांगदेव भगवानराव खैरमोडे

3)महाराष्ट्रातील स्त्री चळवळ प्रा. डॉ. मेघा दुभाषी नवभारत मे जून 2010

4) स्त्री चळवळ काल आज आणि उद्या गीतांजली विमा समाज परिवर्तन चिकित्सा आणि भवितव्य सुगावा प्रकाशन

5]डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री सुधारणा लेखक दिलीप सुरवाडे लोकसाहित्य प्रकाशन एन पाच सेक्टर ई का॑.. चंद्रगुप्त चौधरी भुवन सिडको औरंगाबाद.

hhttpswomen-equaity-day/women'sright-in-india